© 2023 IJNRD | Volume 8, Issue 9 September 2023 | ISSN: 2456-4184 | IJNRD.ORG

IJNRD.ORG ISSN : 2456-4184
INTERNATIONAL JOURNAL OF NOVEL RESEARCH AND DEVELOPMENT (IJNRD) | IJNRD.ORG
An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# स्त्रियांना अध्यात्मिक अधिकार देणारा : महानुभाव पंथ

**प्रा. अजित पुंडलिकराव जाधव**
**मु.पो.आवलकोंडा तालुका उदगीर जिल्हा लातूर**

बाराव्या शतकात मराठी भाषेला दुय्यम स्थान देऊन संस्कृत भाषेला ज्ञानभाषा म्हणून मोठ्या प्रमाणात वापरले जात होते. ब्राह्मणेत्तर वर्गाला ज्ञानबंदी, शिक्षणबंदी, संस्कृतभाषा अभ्यासबंदी होती यामुळे सामान्य माणसांचा बौद्धिक विकास झाला नव्हता.या माणसांची दैनंदिन बोलीभाषा मराठी असल्यामुळे हा समाज संस्कृतभाषा साहित्य व तत्त्वज्ञान या पासून कोसोदूर होता. या अज्ञानी जणास ज्ञानमार्गावर आणण्याचे काम महानुभाव पंथांनी केले व अध्यात्मिक आणि सामाजिक क्रांती घडवून आणली. ज्या समाज व्यवस्थेत ब्राह्मणेत्तर समाजाला शिक्षणाची दारे बंद होती त्या समाजात स्त्रियांना अत्यंत हिनतेची व दुय्यम दर्जाची वागणूक होती. स्त्री म्हणजे एक उपभोगाची वस्तू असून ती शूद्र आहे, असा समज त्याकाळी होता. ज्ञान, व्यवहार आणि समाजामध्ये तिला आदराचे स्थान नव्हते. वेगवेगळ्या सामाजिक चालीरीती, कुप्रथा, निर्भत्सना करणाऱ्या भारतीय परंपरा यामुळे स्त्रियांचे अस्तित्व खूप धोक्यात आले होते. अशा या वेदनादायी काळात भारतीय स्त्रियांना समानतेची वागणूक देणारा महानुभाव संप्रदाय निर्माण झाला. या पंथातील श्रीगोविंदप्रभू व श्रीचक्रधर यांनी तत्कालीन स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने स्थान दिले. त्यांच्या विचार, भावना, कल्पनांना वाव देऊन त्यांच्यातील माणूसपण ओळखले. या काळात स्त्रियांची होणारी हेळसांड, मानसिक कुचंबणा व भावनिक कोंडमारा लक्षात घेऊन महानुभाव पंथीयांनी त्यांच्यातील माणूसपण ओळखले. त्यांच्या प्रतिभाशक्तीला वाव देऊन, त्यांच्यातील कलागुणांना सर्वोच्च स्थान प्राप्त करून दिले म्हणून हा संप्रदाय स्त्रियांना समानतेची वागणूक देणार होता हे लक्षात येते.

महाराष्ट्रातील बारावे आणि तेरावे शतक हे सामाजिक व सांस्कृतिकदृष्ट्या प्रचंड उलथापालथीचे आहे. या शतकामध्ये अनेक पंथ, संप्रदाय, चळवळी निर्माण झाल्या. महानुभाव, नाथ, वारकरी, दत्त आणि वीरशैव हे त्यापैकी काही संप्रदाय आहेत. या संप्रदायाने मानवतावादी व समतेवर आधारित असणारे तत्त्वज्ञान जनलोकांना सांगितले. आपल्या साहित्यनिर्मितीमधून लोकांचे प्रबोधन केले. शतकानूशतकापासून मराठी साहित्यात साचलेले गढूळपण दूर करून आध्यात्मिक लोकशाही या संप्रदायाने निर्माण केली. बाराव्या शतकात महाराष्ट्रामध्ये यादवांची राजवट होती. या काळात संस्कृतभाषा व साहित्य यांना खूप महत्त्व होते. प्रचंड जातीयता, धर्माधर्मातील वाढते तेढ, धार्मिक अंधश्रद्धा, वृत्तवैकल्य, उपवास, देवभोळेपणा, ढोंग अनाचार,अत्याचार खूप बोकाळला होता.शूद्र देवतांची निर्मिती करून त्याद्वारे देवाधर्माच्या नावाने पशु प्राण्यांचा नाहक बळी दिला जात होता. हजारो देवतांच्या मुर्त्या स्थापन करून धार्मिक अंधश्रद्धेला खतपाणी घातले जात होते. त्यामुळे सर्वसामान्य जनता या गोष्टीमुळे खूप भरडली जात होती. देव देवतांच्या नावाने त्यांचे प्रचंड शोषण होऊ लागले. अशा काळात स्त्रियांना तर माणूस म्हणून जगणे खूप अवघड बनले होते. अशा काळात धर्म, संस्कृती, साहित्य त्यांची शिकवण देऊन स्त्रीविषयक समानतेचा दृष्टिकोन महानुभाव संप्रदायाने दिला. तो पुरोगामी विचारावर आधारलेला आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाची कास धरणारा होता.

सतीची प्रथा, देवदासी प्रथा, केशवपण, विधवा पुनर्विवाहाचे प्रश्न, ज्ञानबंदी इत्यादी प्रश्नांनी स्त्रियांचे अस्तित्व मोडकळीस आले होते. मनुस्मृतीच्या प्रभावामुळे या देशातील स्त्रियांना दुय्यम वागणूक मिळत असे अशा काळात तेराव्या शतकामध्ये महानुभाव पंथाने महाराष्ट्रातील सर्व जाती-धर्मातील अठरापगड समाजातील स्त्रियांना जे सन्मानाचे स्थान दिले त्यामुळे अनेक स्त्रिया लिहित्या झाल्या त्या विचार करू लागल्या व आपल्या मनातील भावभावना निर्भीडपणे मांडू लागल्या. श्रीगोविंदप्रभू व श्रीचक्रधर स्वामी या महनीय व्यक्तींनी अतिशय कठीण काळात महाराष्ट्रातील स्त्रियांना जी समानतेची वागणूक दिली ती खूप प्रेरणादायी त्यांच्या विचारांना गती देणारी होती. श्रीचक्रधर हे अत्यंत पुरोगामी विचारांचे, मराठी भाषेचा अभिमान बाळगणारे, बहुजन समाजाचा उद्धार करणारे, स्त्रीक्षूद्रांना समानतेची वागणूक देणारे, स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क व अधिकार बहाल करणारे, धर्मांधता, जातीयता, कुप्रथा, अंधश्रद्धा, कर्मकांड या गोष्टींना कडाडून विरोध करणारे, एक मानवतावादी, समतावादी, विज्ञानवादी, बुद्धिवादी आणि पुरोगामी विचारांचे समाजसुधारक होते. त्यांनी त्यांच्या तत्त्वज्ञानामधून जे विचार मांडले ते तत्कालीन स्त्रियांच्या उन्नतीसाठी व त्यांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी खूप उपयुक्त होते.

महानुभाव संप्रदायातील गद्य व पद्य साहित्याचे अवलोकन केले असता, या साहित्यामध्ये वेगवेगळ्या स्वरूपातील स्त्रियांचे वर्णने येताना दिसतात. या साहित्य लेखनाचे रचियेता पुरुष असल्यामुळे पुरुषप्रधानतेला वाव असला तरी या साहित्य लेखनामध्ये स्त्री जीवनाचे जे प्रतिबिंब उमटते ते पुरोगामी विचारांचे व अध्यात्मिक स्वरूपाचे आहे. गद्य, पद्य आणि स्फूट लेखनामध्ये ज्या स्त्रियांनी लेखन केले आहे त्यांच्या लेखनाचे प्रयोजन भक्ती हेच दिसते. महानुभावीय तत्त्वज्ञान पंथनिष्ठेवर आधारलेले असून त्यामध्ये व्यक्तिमहात्म्य अधिक प्रमाणात येते. या संप्रदायाचे आचारधर्म अत्यंत कडक होते. शिस्त खूप महत्त्वाची मानली जायची.पंथनिष्ठ हीच भूमिका ठेवून या संप्रदायातील स्त्रियांनी लेखन केले. ज्या काळात अत्यंत हिनतेची वागणूक होती त्याकाळात स्त्रियांना संन्याशी मार्गावर नेऊन त्यांच्या अभिव्यक्तीला सर्वोच्च सामाजिक स्थान दिले. खरे तर ज्ञानबंदी असणाऱ्या काळात महानुभाव संप्रदायाने घेतलेला हा ऐतिहासिक निर्णय स्त्री स्वातंत्र्याचा पाया रोवणारा होता.

मराठीतील आद्यपद्य कवयित्री महदंबा या मराठीतील पहिल्या कवयित्री आहेत. त्यांनी 'धवळे' लिहून मराठीतील पहिली कवयित्री होण्याचा मान मिळवला आहे. त्यासाठी त्यांना श्रीगोविंदप्रभू यांनी प्रेरणा दिली व या प्रेरणेतूनच त्यांनी विवाहाचे वर्णन करणारे धवळे गायले. महानुभाव पंथामध्ये महदंबा, नाणकबाई, हिराईसा, गंगाईसा, कमळाईसा, देमती, धनाईसा, उमाईसा, बोणेबाई आदी असंख्य स्त्रिया या संप्रदायामध्ये येतात. लीळाचरित्र,श्रीगोविंदप्रभू चरित्र, सूत्रपाठ, दृष्टांतपाठ, पूजावसार, सातीग्रंथातील काही उदाहरणे व अन्य स्फुट रचना ग्रंथांमध्ये या आठवणी आहेत. यावरून हे स्पष्ट होते की ज्या काळात हेमाद्रीपंडित याने चतुर्वर्गचिंतामणी सारखा दोन हजार वृत्त वैकल्य कसे करावेत हे सांगून समस्त स्त्री व पुरुषांना ढोंगी भक्तीमध्ये अडकवून ठेवण्याचा डाव रचला होता. त्याकाळामध्ये महानुभावीय पंथातील रचनाकारांनी बहुजन समाजाला या अंधकारातून बाहेर काढले व भक्तीचा नवा सन्मार्ग दाखवून दिला.

महानुभावीय पंथ उदयास येण्यापूर्वी महाराष्ट्रातील स्त्रियांना संस्कृती, धर्म, कुप्रथा, जाचक चालीरीती यांच्या नावाखाली वेदनादायी कोंडवाड्यातील जीवन जगावे लागत होते. स्वतःचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी त्यांना इथल्या सांस्कृतिक व धार्मिक व्यवस्थेने नाकारली होते. भारतीय समाजातील अनिष्ट रूढी प्रथा परंपरांनी तत्कालीन स्त्रियांचा आवाज कायमचा मुका केला होता. अशा स्त्रियांना शिक्षणाचे दार बंद होते. लिहिणे, वाचणे, बोलणे यांची अजिबात मुभा नव्हती. अशा स्त्री पारतंत्र्याच्या काळात मानसिक कुचंबनेखाली या स्त्रिया जगत होत्या. एक माणूस म्हणून अस्तित्व हरवलेल्या या स्त्रिया मानवता, सदाचार, स्वातंत्र्य व समानता या मूल्यांसाठी झगडत होत्या परंतु इथली व्यवस्था ही मनुवादी प्रवृत्तीची आणि वर्णाश्रमावर आधारित असल्यामुळे या काळातील सनातनी प्रवृत्तीचे काही लोक स्त्रियांचे स्वातंत्र्य अशुभ मानणारे होते. वैदिक मतप्रणालीचा प्रभाव समाजावर असल्यामुळे स्त्री समानतेच्या बाजूने उभे राहण्यास कोणीही धजत नव्हते. श्रीगोविंदप्रभू, श्रीचक्रधर, संत नामदेव, संत ज्ञानदेव महात्मा बसवेश्वर या समाजधुरीनांनी ते महणीय कार्य केले. त्यांनी ही वर्णवर्चस्ववादी मक्तेदारी मोडून काढली व लोकभाषेतून समाजाला रुचेल आवडेल अशा दैनंदिन भाषेतून व्यवहारातील उदाहरणांमधून नव्या विचारांनी समाजाचे मन प्रकाशमान केले. श्रीचक्रधर व श्रीगोविंदप्रभू यांनी महानुभाव पंथाची तत्त्वप्रणाली उभी करून अशा दुभंगलेल्या काळात स्त्रियांना समानतेची वागणूक दिली.

महानुभावीय काळामध्ये बहुजन समाजातील माणसांना ज्ञानबंदी होती. त्या काळात स्त्रियांबद्दलचा दृष्टिकोन तर खूप हीन व दुराग्रही स्वरूपाचा होता. महाराष्ट्रीयन समाज जीवनात स्त्रियांबद्दलचा अत्यंत उदासीन दृष्टिकोन पहावयास मिळत होता. अशा काळात श्रीचक्रधरांनी महिलाबद्दलचा आदरभाव व्यक्त केला आणि असंख्य स्त्रियांना महानुभाव संप्रदायाची दीक्षा दिली. या संप्रदायांमध्ये त्यांना सामावून घेतले आणि विचार मांडण्याचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य बहाल केले. त्यावेळी स्त्रियांच्या धार्मिक आणि सामाजिक जीवनावर जी बंधने होती ती खूप अन्यायकारक स्वरूपाची होती. हे सर्व जुलमी नियम त्यांनी नष्ट केले आणि या काळातील स्त्रियांना उच्च सामाजिक दर्जा प्राप्त करून दिला. त्यांना सामाजिक स्वातंत्र्य देऊन विचार स्वातंत्र्य दिले. यादवराजा रामदेवराय यांची पत्नी कामाईसा यांना स्वतःच्या इच्छेविरुद्ध पतीच्या निधनानंतर सती जावे लागले होते, त्या काळातील कोणतीही चूक नसणाऱ्या विधवा स्त्रियांना केशवपण करून पांढरे वस्त्र परिधान करावे लागे. अनेक स्त्रियांना आपल्या सासरी मोलकरणी सारखी वागणूक मिळत होती. त्यांचा प्रचंड छळ होत होता. अशा स्त्रियांना श्रीचक्रधरांनी संन्यास दिक्षा देऊन आपल्या पंथात त्यांना स्थान दिले. " स्त्रियांनी बालपणी वडिलांच्या, तारुण्यामध्ये पतीच्या व वृद्धापकाळात मुलाच्या स्वाधीन असावे. " असे मनुस्मृतीमध्ये लिहिलेले आढळते, त्यामुळे स्त्रियांच्या व्यक्तीत्वाला माणूस म्हणून फारसे स्थान नव्हते. तिच्या विचार भावनांना महत्त्व नव्हते. 'यत्र नायृन्तू पूजन्ते रमन्ते तत्र देवता' हे हे वाक्य केवळ शोभेची वस्तू म्हणून होते परंतु तत्कालीन उच्चवर्णीय समाजातील पुरुषप्रधान व्यवस्थेचे कृतीमधील वागणे निराळे होते. ते श्रीचक्रधरांना लक्षात आल्यावर त्यांनी हे सर्व मोडीत काढले आणि नवा आधुनिक, विज्ञानवादी, बुद्धिवादी, तर्काधिष्ठित, समाजाला दिशा व प्रेरणा देणारा विचार सांगितला आणि तो कृतीत आणून स्त्रियांना समानतेचा दर्जा दिला.

श्रीचक्रधरांच्या लीळा डोळसपणे अभ्यासल्या तर या लीळांमधून स्त्रीउद्धारक व समाजसुधारक श्रीचक्रधर पहावयास मिळतात. यादवकाळामध्ये केवळ शोभेची वस्तू म्हणून धार्मिक कार्यात वापरली जाणारी स्त्री ही दुय्यम दर्जाची होती हे लक्षात येते. त्यामुळे या

स्त्रियांचे सामाजिक स्थान खूप शूद्र स्वरूपाचे होते. श्रीचक्रधरांनी या स्त्रियांना संन्यास घेऊन परमार्थ करण्यासाठी अनुमती दिली. मासिक धर्मामध्ये विटाळ मानणाऱ्या 'ऊमाईसेला' ही एक नैसर्गिक क्रिया आहे, तो विटाळ कसला. नाकावाटे ज्याप्रमाणे दुर्गंधी जाते त्याप्रमाणे ती दुर्गंधी समजावी. हा वैज्ञानिक वस्तूपाठ दिला. 'आऊसा' यांच्या मनातील प्रश्न दूर करून अंधश्रद्धा हा समाजाला कृतडणारा महारोग आहे त्यापासून सर्व स्त्रियांनी दूर राहिले पाहिजे हे वेगवेगळ्या उदाहरणांमधून त्यांनी समजावून दिले. महिलांच्या कलागुणांना वाव मिळावा या हेतूने गायन, वादन, नृत्य करणाऱ्या असंख्य महिलांना श्रीचक्रधरांनी प्रेरणा दिली आणि त्यांच्या अंगी असणाऱ्या विविध कलागुणांचा स्वीकार केला. 'आबाईसा' यांच्या चित्रकलेचे त्यांनी तोंड भरून कौतुक केले व त्यांना चित्र काढण्यासाठी प्रोत्साहित केले. 'बोनेबाई' यांचे मनोरथ पूर्ण करून त्यांना श्रीचक्रधरांनी आईचे प्रेम दिले. वेळोवेळी प्रसंगपरत्वे समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये स्त्रियांना आणण्याचे अतुलनीय कार्य महानुभाव पंथाने केल्याची दिसते.

मध्ययुगीन काळातील स्त्रिया ह्या पारंपरिक पद्धतीने जीवन जगणाऱ्या, परावलंबी आणि स्वातंत्र्यापासून दूर असणाऱ्या होत्या. या काळामध्ये महाराष्ट्रात जे विविध धर्म,संप्रदाय निर्माण झाले उदा. नाथ, वारकरी, महानुभाव, श्रीदत्त, वीरशैव या पंथातील माणसांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन उदार व समानतेचा होता. महानुभाव पंथ त्यापैकी एक आहे. महानुभावीय लेखकांनी पौराणिक स्त्रियांची रूप वर्णने रेखाटली आहेत. त्या लेखनामागे स्त्रियांच्या प्रती आत्मीयतेचा भाव होता. श्रीकृष्णचरित्रामध्ये रुक्मिणी, सत्यभामा, जाबवंती, रेवती यासारख्या स्त्रिया येतात. श्रीचक्रधर हे महाराष्ट्रभर भटकंती करणारे समाजसुधारक होते. त्यांच्या दर्शनासाठी अनेक स्त्रिया येत असत. त्या गरीब, श्रीमंत, कष्टाळू, विविध दुःखांनी ग्रासलेल्या, विवंचनेत असणाऱ्या, संसारिक अडचणीने त्रस्त झालेल्या, आत्महत्या करण्यासाठी निघालेल्या, विविध रूपातील स्त्रिया आहेत. त्या माता, पत्नी, कन्या, वेश्या अशा वेगवेगळ्या भूमिकेतून येताना आढळतात. या सर्व स्त्रियांचे दुःख हलके करून त्यांना भक्ती, परमार्थ व सन्मार्ग दाखविण्याचे काम श्रीचक्रधर यांनी केले व त्यांना आनंदाचा,मुक्तीचा नवा आत्मस्वर दिला ही मोठी सामाजिक क्रांतीच होय.

श्रीगोविंदप्रभू चरित्रामध्ये येणाऱ्या स्त्रिया ह्या विविध रूपांमधील आहेत. 'रिद्धपूर' हे बाजारपेठेचे गाव असल्यामुळे तिथे माळीनी,तेलीनी, गवळणी या व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया आहेत. सासुरवास करणाऱ्या सासवा, छळ सहन करणाऱ्या सुना आहेत. कष्टाळू स्त्रिया, संसारिक स्त्रिया, वाईट चालीच्या स्त्रिया, दळण कांडण करणाऱ्या स्त्रिया, अलंकाराचा मोह असणाऱ्या स्त्रिया, वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया अशा विविध रूपांच्या स्त्रिया आढळतात. 'दृष्टांतपाठ' या ग्रंथामध्ये पतीव्रता, विधवा, प्रेयसी, एकनिष्ठ भक्त, विरहिणी, माता यासारख्या विविध प्रतिमा मधील स्त्रिया येतात. 'धवळे' या गीतामधून व्यक्त होणारे महदंबेचे प्रतिभाशाली व्यक्तिमत्व सर्वश्रुत आहे. बाईदेवबास यांचा 'पुजावसार' हा ग्रंथ श्रीचक्रधर यांचा दिनचर्या विषयक माहिती देणारा ग्रंथ आहे. यामधून स्वामीभक्ती, एकनिष्ठता, व श्रद्धाशील बाईदेवबासांचे व्यक्तिमत्व आपल्यासमोर येते. तीर्थयात्रेला जाणारी बोणेबाई, द्वारावतीला जाणारी महदाईसा आणि आचलपूरची रामटेकला जाणारी वेश्या. या सर्व स्त्रिया ह्या धार्मिक विधींचे पालन करणाऱ्या व स्वतःला सन्मार्गामध्ये हरवून घेणाऱ्या होत्या. मासोपवास करणाऱ्या अनेक स्त्रिया ह्या लीळाचरित्रामध्ये येतात. उपवास करणाऱ्या आबाईसा, माईबाई, उमाबाईसा, देमती, या स्त्रिया येतात. संन्याशी, गृहिणी, लेकुरवाळ्या, सुगरणी, सासुरवाशीण, दुःखी स्त्रिया, प्रेमळ स्त्रिया, धाडसी, विरहिणी, नटण्या मुरडण्याची हौस असलेल्या स्त्रिया, व्यावसायिक, तपोनिष्ठ, अंधश्रद्धाळू, परमार्थिक अशा अनेक रूपांमधील स्त्रिया येतात. या विविध रूपातील स्त्रिया ह्या श्रीचक्रधरांना जेव्हा भेटतात तेव्हा त्या विविध समस्यांनी ग्रासलेल्या आढळतात परंतु त्यांच्या मनाचा भावनेचा आदर करून श्रीचक्रधरांनी त्यांना संन्याशी होण्याचे सांगितले आणि त्यांच्या जीवनाला एक आकार दिला म्हणून श्रीचक्रधर हे स्त्री उद्धारक व समाजसुधारक वाटतात.

या विविध स्त्रियांचे रूपे लक्षात घेता त्या काळातील सामाजिक व सांस्कृतिक जीवनाची पद्धती कशी होती हे लक्षात येते. त्यांच्यावर असणारी सामाजिक बंधने रूढी, प्रथा, परंपरांचा पगडा किती जाचक होता हे स्पष्ट होते. त्यामुळे या सर्व स्त्रियांचे जगणे एक माणूस म्हणून किती वेदनादायक अस्वस्थकारक होता हे लक्षात येते. स्त्रियांच्या भक्ती स्वातंत्र्याला बाधा आणणारे समाजमन किती विषम विचाराचे होते हे स्पष्ट जाणवते. अशा स्त्री विवंचनेच्या काळामध्ये श्रीचक्रधरांनी स्त्रियांबद्दलचा दाखवलेला मानवतेचा भाव एक सामाजिक क्रांती करणारा आहे. स्त्रियांना सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक जीवनामध्ये अधिकाराचे व आदराचे स्थान निर्माण करून देणारा आहे. सर्व मानव जात समान असून, जातीभेद, वर्णभेद, लिंगभेद कोणीही मानू नये. वाणीने व मनाने कोणासही कधीही दुखवू नये. सर्वांशी प्रेमाने व आपुलकीने वागावे. हा अत्यंत मोलाचा विचार त्यांनी सांगितला व तत्कालीन समाजातील स्त्रियांचा सन्मानपूर्वक आदर केला. महानुभाव पंथाने स्त्रियांच्या मनातील मातृत्व प्रेमाचा आदरभाव जपून संन्यास धर्माचे स्वातंत्र्य त्यांना बहाल केले. पुरुषाप्रमाणेच एक व्यक्ती म्हणून मनमोकळेपणाने त्यांना जगता यावे यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. वेगवेगळ्या दुःखातून स्त्रियांना मुक्त करून त्यांना संन्यासी मार्गावर आणले. ज्या समाज व्यवस्थेत त्यांच्यावर कडक निर्बंध होते जाचक बंधने होती ती सर्व बंधने श्रीचक्रधरांनी झुगारून दिली व महाराष्ट्रातील स्त्रियांना समानतेची मायेची ममतेची व मानवतेची वागणूक दिली. म्हणून महानुभाव गद्य, पद्य व स्फूट साहित्यामधून येणारे चित्रण हे स्त्री स्वातंत्र्याबद्दल प्रश्न उपस्थित करणारे जिव्हाळा असणारे आणि भारतीय स्त्रियांना समानतेची वागणूक देणारे होते.

संदर्भ ग्रंथ :

1)संपा. आसाराम लोमटे, सर्वज्ञ श्रीचक्रधर जन्मअष्टशताब्दी विशेषांक, प्रतिष्ठान अंक, मार्च एप्रिल मे जून 2022
2)डॉ. आवलगावकर अविनाश, महानुभाव साहित्य शोध संचार, प्रतिमा प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती 2006
3)डॉ. इर्लेकर सुहासिनी, महदंबेचे धवळे, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे, तृतीयावृत्ती 1999
4)डॉ. कोलते वि.भी., लीळाचरित्र, शासकीय प्रत म.रा.सा.स.म. पुणे 1982
5)तुळपुळे शं.गो., महानुभाव पंथ व त्यांचे वाड;मय, व्हिनस प्रकाशन पुणे 1973
6)डॉ. थिळगे वंदना, मराठी काव्यातील स्त्री चित्रण, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती 2006
7)डॉ. संजय जगताप, महानुभाव साहित्यातील स्त्री प्रतिमा, यशोदीप पब्लिकेशन्स पुणे, प्रथम आवृत्ती 2019